**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान - कुलगुरु
## विद्यापीठात उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

अमरावती.

प्रामाणिकपणे व सहजपणे कार्य करणारे कर्मचारी विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये आहेत, त्यांनी उत्कृष्ट कामाच्या रुपाने आदर्श निर्माण करण्याचे कार्य केले असून त्याचा मला कुलगुरू म्हणून मनापासून आनंद होत आहे. उत्कृष्ट पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान समाजाचा व संस्थेचा दर्जा वाढविणारे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव श्री डी.एस. राऊत, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. मनिषा काळे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व चांदीचे पदक देवून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात पटलधमल वाधवाणी फार्मसी महाविद्यालय, यवतमाळचे प्राचार्य डॉ. अनिल विश्वनाथ चांदेवार यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील सहय्यक प्राध्यापक डॉ. मिलींद विष्णुपंत शिरभाते यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागातील सहा. प्राध्यापक श्री सुहास ज्ञानदेव पाचपांडे यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात विकास विभागाचे उपकुलसचिव श्री मंगेश केशवराव वरखेडे, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात गोपनीय विभागाचे अधीक्षक श्री निदान महादेवराव बारस्कर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात विद्या विभागातील कनिष्ठ सहाय्यक श्री मोहन निरंजनराव इंगळे यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सामान्य प्रशासन विभागातील सफाईगार श्री शंकर भैय्यालाल भगतपुरे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि. बुलढाणा येथील अधीक्षक श्री डिगांबर रामराव धुमाळे यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रा. राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.एम.एस. अली यांचा रु. ५००१/- रोख पारितोषिक व गौरव प्रमाणपत्र देवून सत्कार केला.

वार्षिकांक स्पर्धेत शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक विद्याभारती महाविद्यालय, अमरावती, द्वितीय भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, तृतीय भारतीय महाविद्यालय, अमरावती, व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा, द्वितीय श्री.ह.व्या.प्र.मं.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावती, तृतीय सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावती तसेच ग्रामीण विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार, द्वितीय क्रमांक कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब, व तृतीय क्रमांक कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा या महाविद्यालयांच्या उत्कृष्ट वार्षिकांकासाठी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते पारितोषिक देवून महाविद्यालयांना सन्मानित करण्यात आले.

कुलगुरू मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, सर्व उत्कृष्ट प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संस्थेप्रती निष्ठा ठेवून कार्य केले आहे. त्या कार्याची दखल विद्यापीठाने घेवून त्यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देवून सन्मानित केले. पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा सन्मान विद्यापीठाने केला असून तो सर्वांसाठी प्रेरणादायी व आदर्श असा आहे. त्यांना पुरस्कार देवून त्यांच्या चांगल्या कामाची दखल विद्यापीठाने घेतली. १ मे, १९८३ रोजी स्थापन झालेल्या विद्यापीठाचा प्रवास छत्तीस वर्षांपासून सक्षमपणे सुरु आहे. या सफल प्रवासासाठी अनेकांचे योगदान लाभले असल्याचे सांगून त्यांनी पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले.

सकाळी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात १ मे महाराष्ट्र राज्य स्थापना दिनप्रसंगी ध्वजारोहण कुलगुरुंचे हस्ते पार पडले. याप्रसंगी कुलगुरुंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमा पुजनाने झाली. आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. मनिषा काळे व कुलसचिव श्री डी.एस. राऊत यांनी पुरस्कारकर्त्यांचा परिचय करुन दिला. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला व्य.प. सदस्य डॉ. प्रसाद वाडेगांवकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, वित्त व लेखा अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, एल.एल.ई.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ.एस.एफ.आर. खाद्री, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, रा.से.यो.चे प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे, तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. ०१/०५/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 145